"महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा तुलनात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

मानव्य विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी.
पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा प्रारुप आराखडा

संशोधक

प्रा. सुनिल उमराव वरवटे

शामगीर कनिष्ठ महाविद्यालय
कोतलशिवणी, ता. निलंगा,
जि. लातूर (महाराष्ट्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. यशवंत आर. वळवी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

संशोधन केंद्र

पिपल्स कॉलेज
नांदेड, जि. नांदेड (महाराष्ट्र)

ऑगस्ट २०२३

महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा तुलनात्मक अभ्यास

१.१ प्रस्तावना :

भारत हा संत महापुरुष क्रांतिकारकांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात एका विशिष्ट अंतराने जात, धर्म, भाषा, प्रांत आणि भोगोलिक परिस्थिती हि बदलत असते. त्या परिस्थितीचा तिथल्या राजकीय समाजीक आर्थिक धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थीतीवर प्रभाव जाणवू लागतो. स्थळ काळ आणि परिस्थिनुसार समस्या निर्माण होत असतात. त्याच समस्येतून समाजातल्या विविध घटकातून एखादे नेतृत्व उदयास येते. आपल्या निरीक्षणातून आणि चिकित्सक बुद्धीतून समाजाला वेगळी दिशा देण्याचे काम करतात. स्वातंर्त्य सामता बंधुता न्याय या जीवन मूल्यातून समाज सक्षम संस्कारित आणि समृद्ध करण्याचे मानवतावादी कार्य त्या नेतृत्वाने केले आहे. मग ते महात्मा बुद्ध, चार्वक, कबीर, महात्मा बसवेश्वर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर, यांनी आपल्या विचारातून मानवतावादी मूल्य समाजात रुजवण्याचे काम केले आहे.

या महापुरुषांचा स्थळ काळ आणि परिस्थिती हि जरी वेगळी असली तरी त्यांचा लढा स्वातंर्त्य सामता बंधुता न्याय या मानवी मूल्यांसाठी होतो.

प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय राजकीय व्यवस्था समाजव्यवस्थेत वेवेगळ्या कालखंडात स्थितरे घडून आल्याचे दिसतात. हि स्थितरे कधी शांततेचा मार्गाने तर कधी संघार्षाच्या माध्यमाने झाले एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही स्थितरे वेवेगळ्या नेतृत्वात हस्तांतरित झाले.

महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज या महापुरुषांची तत्कालीन परिस्थिती पहाता ती राज्यशाही व्यवस्था होती. या व्यवस्थेत राजा हाच सार्वभौम होता. राज्याचा आदेश हाच त्या राज्याचा कायदा होता. त्या कायदयानुसारच राज्यकारभार चालत असे. या व्यवस्थेत लोककल्याणापेक्षा राजा व त्यांचे निकटवर्तीय यांचे कल्याण हा एकमेव हेतू होता. राजा सतत लढाया करणे, साम्राज्य विस्तार करणे यात मग्न असायचा. जेवढे साम्राज्य होते, त्या पूर्ण साम्राजाचा मालक एकमेव राजा असायचा, जनता मात्र गुलाम होती. जनतेच्या संपत्तीवर राजा

मनमानी कर लावायचा. अशा अन्यायकारी व्यवस्थेत १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वर आणि २० व्या शतकात राजर्षी शाहू महाराज यांनी आपणाला मिळालेली सत्ता ही आपली नसून ती लोकांची व लोकांच्या हितासाठीच असते या विचारातून सामाजिक समता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. दोघेही सत्तेचे अधिकारी असताना लोकांचे स्वातंत्र्य अबाधित राहील, सर्वांना समान न्याय मिळेल, समाजातील विविध घटकामध्ये बंधुभाव कसा राहिल यासाठी त्यांनी राज्यशाही व्यवस्थेत स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही लोकशाही मुल्य रुजविण्याचे महान कार्य केले. राजकिय व्यवस्थेतून सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे कार्य दोन्ही महापुरुषांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये केले आहे.

महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकातील द्रष्टे क्रांतीकारी, चिंतक आणि युगप्रवर्तक समाजसुधारक होते तर राजर्षी शाहू महाराज हे विसाव्या शतकातील अभूतपूर्वक व्यक्तीमत्त्व होते. या दोन्ही महापुरुषांच्या जीवन काळामध्ये सुमारे आठशे वर्षाचे अंतर असून सुद्धा दोघांच्या विचारात साम्यता दिसून येते. दोन्ही युगातील सामाजिक परिस्थितीमध्ये फारसा काही बदल नव्हता. सर्व मानसिक भावरोधांनी उद्वेगून गेले होते. उच्च कुलीन पुरोहितशाही कुटुंबात जन्म घेऊन सुद्धा बसेवश्वरांनी कधी आपल्या उच्च कुलीन होण्याचा कुठेही उल्लेख केला नाही. त्यांनी आपल्या जन्मदात्या माता पित्यांचा कधी कुठे उल्लेख केला नाही. परंतु आपला परिचय सांगतांना स्वतःला ढोर आणि कक्कय्या व मातंग चन्नय्या यांच्या घरातील दास दासींचे अवैध संतान म्हणून घेतले आहे. पुढच्या जन्मी हरिजन कुलात जन्म घेण्याची कामना बाळगणा?्या आपल्या समकालीन महत्त्यापेक्षा याच जन्मात दलितांच्या समवेत आपली अस्मितता राखणारे महात्मा बसवेश्वर किती महान होते यावरुन लक्षात येते. महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांना जेव्हा आपण या पार्श्वभूमीतून पाहतो तेव्हा उभय महापुरुष आपल्या जातीच्या पिंजऱ्यातून बाहेर पडून सच्चा मानवतावादी रुपात दिसतात.

मानवीय संवेदना असलेल्या या उभय महान पुरुषांनी सर्वोदय साधण्याचे कार्य केले. अहिंसात्मक धार्मिक क्रांतीद्वारे सामाजिक आर्थिक क्रांती यशस्वी करण्याकरिता महात्मा बसवेश्वरांनी व्यवस्थित कार्यक्रम आखले होते. तर राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक क्रांतीद्वारे राजकीय, आर्थिक क्रांती यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक आर्थिक सिद्धी, राजकीय सिद्धी ही धर्माच्या चौकटीतच मिळविली पाहिजे असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते.

राजर्षी शाहू महाराजांनी विसाव्या शतकात जे दलितोद्धारकांचे कार्य हाती घेतले तेच कार्य महात्मा बसेवश्वरांनी त्या आधी बाराव्या शतकात प्रभावी व व्यापक रितीने केले. सामाजिक, आर्थिक, नैतिक, राजकीय व स्त्री स्वांतर्त्य अशा विविध क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले म्हणून त्यांचे विचार समाजाला मार्गदर्शक ठरतात. म्हणून प्रस्तुत शोधप्रबंधात महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचाराचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

१.२ संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उदिष्टये विचारात घेण्यात आलेली आहेत.

१. महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेणे.

२. महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक समतेची संकल्पना समजून घेणे.

३. महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या लोकशाही विचारांचा अभ्यास करणे.

४. महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांची आरक्षण संकल्पना समजून घेंणे.

५. महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

१.३ संशोधन विषयाची गृहितके :

संशोधन समस्येचे निर्धारण केल्यानंतर त्या समस्येच्या संदर्भात काही अनुमाने व काही संभाव्य उत्तरे विधानांच्या स्वरुपात मांडली जातात. संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी गृहितकांची मांडणी करावी लागते. प्रस्तुत संशोधनासाठी केलेल्या गृहितकांची मांडणी पुढीलप्रमाणे

१) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारामध्ये साम्य आहे.

२) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज हे समतेचे पुरस्कर्ते आहेत.

३) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज दोन्ही महापुरुषांनी लोकशाही मुल्य प्रत्यक्षात आनण्याचा प्रयत्न केला.

४) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या राजकिय विचारामध्ये साम्य आहे.

५) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचाराची आजच्या काळात उपयोगिता आहे.

६) महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रशासकिय व्यवस्थेमध्ये साम्य आहे.

१.४ संशोधन विषयाची निवड व महत्त्व :

भारतातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यामुळे समाजात निर्माण झालेल्या विविध समस्या मानवाला माणूस म्हणून न लेखणे समाजात आपआपसात भेदभाव करून अमुक एका जातीला महत्त्व देणे. यामुळे भारतात इंग्रजी सत्तेसोबतच अंतर्गत गुलामी सुद्धा अस्तितत्वात होती. या विरुद्ध कार्य करणाऱ्या दोन महान विद्वानांमध्ये महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांचा समावेश होतो. हे दोन्ही विद्वान वेगवेगळ्या कालखंडात जन्माला आले किंबहूना त्यांच्या विचारधारांमध्ये जवळपास ८०० वर्षाचे अंतर आहे. असे असून सुद्धा या दोहोंनी केलेले कार्य मात्र समान आहे. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात जे अनुभवले तेच राजर्षी शाहू महाराज विसाव्या शतकात. या अनुषंगाने मी **'महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा तुलनात्मक अभ्यास'** हा विषय संशोधनासाठी निवडलेला असून प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासाद्वारे १२ व्या शतकातील महात्मा बसवेश्वर व २० शतकातील राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारातील तुलनात्मक अभ्यासातून तत्कालीन परिस्थितीची जाणीव करून दिली जाणार आहे. तसेच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील विचार आणि कार्याच्या आधारे त्यातील साम्य व भेद अभ्यासून तुलना करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

१.५ संशोधन पद्धती :

कोणत्याही घटकांचा अभ्यास करतांना वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून नैसर्गिक शास्त्रात अध्ययन केले जाते. त्याचप्रमाणे वैज्ञानिक पद्धतीद्वारे सामाजिक घटनांच्या संदर्भात संशोधन करता येते. जे संशोधन सामाजिक किंवा राजकीय घटनासंदर्भात केले. अशा संशोधनाला राजकीय संशोधन म्हणतात. संशोधनात एक नित्य व नवा दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. कोणत्याही राजकीय समस्या अभ्यासतांना तिच्या अनेकविध पैलु बाबत शास्त्रीय विवेचन करणे महत्वाचे ठरते. सदरील संशोधन विषयही त्यास अपवाद नाही. प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी संख्यात्मक (Quantitative) आणि गुणात्मक(Quanlitative) संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, विश्लेषणात्मक तुलनात्मक संशोधन पद्धतीचाही वापर करण्यात येणार आहे.

१.६ तथ्य संकलन

तथ्य संकलनाची प्रमुख दोन साधने असलेली दिसून येतात. ती म्हणजे

अ) प्राथमिक साधने

ब) दुय्यम साधने

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलन करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून यामध्ये प्रामुख्याने प्रकाशित शासकीय दस्ताऐवज, पूर्व संशोधकाचे प्रकाशित/अप्रकाशित शोधप्रबंध, महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांचे स्वतः लिखित ग्रंथ, महात्मा बसवेश्वरांविषयी इतरांनी लिहिलेले संदर्भ ग्रंथ, राजर्षी शाहू महाराजारांविषयी इतरांनी लिहलेले संदर्भ ग्रंथ, अनुवादित ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध व नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ इत्यादींचा समावेश करण्यात येणार आहे.

१.७ संशोधन आराखडा :

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करतांना निश्चित स्वरूपाचे उद्दिष्ट असते. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्त्वाची असते. कारण अशा पूर्व नियोजित मांडणीतून किंवा निर्णयामुळे संशोधन भटकत नाही तसेच योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते.

प्रस्तुत संशोधनाच्या शोधप्रबंधाचा आराखडा किंवा प्रकरण रुपरेषा खालीलप्रमाणे आहे.

१.८ प्रकरण रचना :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण रचना अपेक्षीत आहे.

प्रकरण १ ले : प्रस्तावना व संशोधन पध्दती :

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना व पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर संशोधन विषयाचे महत्त्व, समस्या सुत्रण, उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य संकलनाचे स्वरुप, संशोधन आराखडा, पूर्व संशोधकांचा आढावा, प्रकरण निहाय संक्षिप्त सारांश व नियोजन यांचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण २ रे : महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या तत्कालिन परिस्थितीचा आढावा :

शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये बाराव्या शतकातील विद्वान महात्मा बसवेश्वर त्यावेळेसची परिस्थिती आणि विसाव्या शतकातील राजर्षी शाहू महाराज यांच्या वेळेसची तत्कालीन

परिस्थिती यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे : महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास

शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा जातीयता, अस्पृश्यता दूर करण्यासाठी महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांनी महान कार्य केलेले असून माणसामाणसामध्ये भेद निर्माण करणाऱ्या चातुवर्ण व्यवस्थेमध्ये समाज शोषित आणि पिढित होता. अशा समाजाला या दोन महापुरुषांनी राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून समताधिष्ठित समाजाचा पाया घालणाऱ्या महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराजांच्या या कार्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ वे : महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या लोकशाही संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास :

तत्कालीन राजकिय व्यवस्थेत लढाया करणे, साम्राज्य विस्तार करणे, स्वहिताबरोबर आपल्या निकटवर्तीयांचे हित साधने हा प्रमुख उदेश होता. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वर आणि २० व्या शतकात राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या विचार आणि कार्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाही मुल्यांचे समाजात बीजारोपण केले. त्यातुन सक्षम, संस्कारीत, सुद्रढा मानवकेंद्रित समाजाची निर्मिती झाली. या दोन्ही महापुरुषांच्या लोकशाही संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे : महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या राजकिय विचारांचा तुलनात्क अभ्यास :

शोधप्रबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. या दोन महापुरुषांनी राजकिय सत्ता हे समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपले राजकिय वलय निर्माण केले होते. मिळालेली सत्ता ही स्वहितासाठी नसून ही लोकांच्या कल्याणासाठी असते या विचारातून त्यांनी कृतिशिलपणे कार्य केले. सत्तेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन परिवर्तन घडवून आणता येते हे जगाला दाखवून दिले. दोन्ही महापुरुषांचा राजकिय विचारांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे : महात्मा बसवेश्वर व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचाराची प्रासंगिकता :

कोणत्याही महापुरुषांचे विचार स्थळ, काळ सापेक्ष असतात. जात, धर्म्, भाषा, लिंग, प्रांत यांच्या पलिकडे जावून मानवी कल्याण हा त्यांच्या विचारांचा मुख्य धागा असतो. त्यमूळे त्यांनी दिलेल्या विचारांची प्रासंगिकता अबाधित आहे. ती कधिही नष्ट होणार नाही. महात्मा बसवेश्वर आणि राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या विचार आणि कार्यातून नेहमीच समाजाला प्रेरणा दिलेली आहे. आजच्या आधुनिक समाजात जात, धर्म, लिंग, भाषा, प्रांत हा भेदभाव पाळला जातो, सत्तेचा गैरवापर केला जातो, अशा अज्ञानी , अंधश्रधाळू, भ्रष्टाचारी, सत्तांध समाजाला दोन्ही महापुरुषांनी राजकिय व्यवस्थेतून दिलेल्या सामाजिक समतेची, लोकशाही मुल्यांची आणि कृतिशिलतेची अत्यंत गरज आहे. अशाप्रकारे आजच्या परिस्थितीमध्ये या दोन महापुरुषांचे लोकशाहीभिमूख विचार असे महत्वाचे आहेत, याबाबतचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ७ वे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये प्रस्तुत वरील एकूण सहा प्रकरणांच्या अभ्यासातून निष्पन्न झालेले निष्कर्ष व शिफारशी याबाबतची माहिती देण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. बी. आर. हिरेमठ, मराठी अनुवाद करडीगुधि महाराष्ट्र बसवं युगीन शरणाची वचणे खंड -४

२. गाठाळ साहेबराव., आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्र. १४.

३. घुगरे सूर्यकांत (१९९९)., 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज'., साधना बुक स्टॉल., कोल्हापूर.

४. पंडित संकाये का. शि. (निर्देशित)., 'विश्वधर्म' (मराठी)., पृष्ठ क्र. ४४.

५. शि.बा. स्वामी - 'मानखेडकर ज्ञानप्रसाद', जानेवारी १९८९, पृष्ठ क्र. ११.

६. मेनकुदळे अशोक (२००८).,आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी, जी. बीदर,

७. तिवारी भगवानदास (२००१), 'जगतज्योती महत्त्मा बसवेश्वर' याविषयावरील ग्रंथ.

८. कप्पीकेरी शंकरराव, 'कबीर- बसवेश्वर तुलनात्मक अध्ययन' याविषयावरील ग्रंथ.

९. जिरोबे राजेंद्र (१९८०) : 'वचनामृत बसवेश्वरी', याविषयावरील ग्रंथ.

१०. कलीमठ शंकरय्या (१९९७) 'महात्मा. बसवेश्वरांच्या राजकीय कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयावरील आपला लघू शोध प्रबंध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठास सादर केला राज्यशास्त्र या विषयाअंतर्गत सादर केला आहे.

११. चव्हाण, यशवंतराव. १९७६. 'मोठ्या दिलाचा राजा.' साळुंके, पी.बी. (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ. मुंबई : महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय. पृ.२५१

१२. कांबळे, नारायण. २००७. 'राजर्षी शाहूंचे सामाजिक विचार आणि कार्य : एक समाजशास्त्रीय अभ्यास.' पीएच. डी. प्रबंध (अप्रकाशित) औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, पृ. ९१.

१३. पवार, जयसिंगराव. (संपा.) २००१. राजर्षी स्मारक ग्रंथ. कोल्हापूर : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी. पृ. ५

१४. फडके, य.दि. १९८९. विसाव्या शतकातील महाराष्ट्र. खंड १. प्रथमावृत्ती पुणे. पृ. ३३

१५. कीर, धनंजय. १९७९ राजर्षी शाहू छत्रपती - एक समाजक्रांतिकारक राजा. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन. पृ. ४३

१६. संगवे, विलास आणि खणे, बी. डी. १९९३. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स. खंड २. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ. पृ. ३०
१७. खणे, बी.डी. १९७८. श्री. शाहू ए स्टडी ऑफ सोशल, पॉलिटिकल रिफॉर्मर्स (१८८४१९२२) अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ.
१८. जाधव, रमेश. १९८८ कॉंट्रीब्युशन ऑफ फुले ॲन्ड शाहू टू कास्ट ॲन्ड रिलीजन. अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ.
१९. भोसले, एस.एस. (संपा.) १९९१ . राजर्षी शाहू : काळ व विचार. कोल्हापूर : जिल्हा परिषद कोल्हापूर.
२५. डॉ. पु. ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर (१९८७)
२६. डॉ. प्रदीप आगलावे संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर (२०००)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. यशवंत आर. वळवी
राजशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर, ता. जि. लातूर

संशोधक

सुनिल उमराव वरवटे
शामगीर कनिष्ट महाविद्यालय,
कोतलशिवणी, ता. निलंगा, जि. लातूर